# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/६५/२०१९
दि.२७/०६/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

............अपिलार्थी

श्री.बी.एल.अग्रवाल, श्री कालाभैरव उपासना मंडळ,
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

...............प्रतिवाद

जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: विवेचन :-

श्री.बी.एल.अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.११/०३/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला

१) श्री. दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांच्याकडे कोणकोणते विभाग आहेत. याची माहिती देण्यात यावी. सदर विभागाचे अधिकार त्यांच्याकडे देण्यात आलेल्या आदेशाची प्रत साक्षांकित करुन देण्यात यावी.

२) श्री.दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांना स्वत:च्या अधिकारामध्ये किती रकमेपर्यंत कार्यादेश देण्याचे अधिकार आहेत. याची माहिती देण्यात यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२७/०५/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/९५/२०१९ दि.१३/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर गेले असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.२७/०६/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/१०५/२०१९ दि.१९/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

Scanned by CamScanner

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.११/०३/२०१९ रोजीच्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास ०७ दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.बी.एल.अग्रवाल, श्री कालाभैरव उपासना मंडळ, बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner